पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी,
पुणे – ४११ ०१७
जा.क्र.ड/१३/कावि/ ५७ /२०१५,
दिनांक ३०/०६ / २०१५

प्रति,
मा.श्री/श्रीमती -----------------------------
-------------------------------------------
-------------------------------------------

विषय :- ड प्रभाग समितीची मासिक सभा कार्यपत्रिका क्र. ४
दिनांक ०३ /०७/२०१५

महोदय,

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे जुलै महिन्याची मासिक सभा ड क्षेत्रिय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे शुक्रवार दिनांक ०३/०७/२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेली आहे.

सदर सभेमध्ये सोबत जोडलेल्या कार्यपत्रिकेप्रमाणे कामकाज करण्यात येईल. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव, सभाशाखा**
ड क्षेत्रिय कार्यालय,पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे-१७

सोबत - कार्यपत्रिका क्र: ४,
दिनांक:- ०३ /०७/ २०१५

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे-१७**

**ड प्रभाग समिती,**

**कार्यपत्रिका क्र.४**

दिनांक ०३/०७/२०१५ वेळ दुपारी १२. ०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ड प्रभाग समितीची माहे जुलै महिन्याची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०३/०७/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. रहाटणी येथील ड क्षेत्रिय कार्यालयाचे “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजित केलेली आहे. सभेमध्ये खालीलप्रमाणे कामकाज होईल.

१) मागील कार्यपत्रिका क्रमांक ३, दिनांक १९/०६/२०१५ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणे.

२) प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे गावठाण येथील पिंपरी वाघेरे गाव स्मशानभूमीजवळ मनपाचे शौचालय बांधलेले असुन त्यामुळे सदर परिसराजवळील नागरीकांच्या तक्रारी वाढत आहेत. दुर्गंधी पसरल्यामुळे आरोग्याच्या दृष्टीने हे योग्य नसल्याने सदर परिसरातील नागरीकांच्या शौचालय पाडणेबाबत वारंवार तक्रारी येत असल्याने सदर शौचालय पाडणे

३) प्रभाग क्र. ४५ पिंपरी वाघेरे गावठाण मधील १०० फुटी रस्ता पिंपळे सौदागर पुलाजवळ मनपा मार्फत ज्येष्ठ नागरीक व महिला बचत गटासाठी विरंगुळा केंद्र बांधण्यात आलेले असुन सदर ठिकाणचा वापर होत नसल्याने तेथे मद्यपी तसेच देवीदेवतांचे फोटो लावणेत आलेले आहेत त्यामुळे जातीय कलह निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे सदर ठिकाणी सुशोभीकरणांतर्गत ज्येष्ठ नागरीकांसाठी बेंचेस, तसेच लॉन वगैरे लावुन सुशोभिकरण करणे

४) पिंपळे निलख प्रभाग क्र. ५४ येथील कै. प्रभाकर नारायण साठे उद्यानामध्ये कै. प्रभाकर नारायण साठे मा. महापौर पिंपरी चिंचवड म.न.पा. यांचा अर्धाकृती पुतळा उभारणे कामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणे

५) मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय.

सही/-

**प्रशासन अधिकारी, तथा**

**सचिव, सभाशाखा**

ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी, पुणे-१७

जा.क्र.ड/१३/कावि/५८ /२०१५
दिनांक : ३० / ०६ /२०१५